झाले आहे. दर आठवड्याला किमान दोन तरी ही अशी पत्रे येतात.

श्री साई सांगत, जो कष्ट सहन करतो, तो संत होतो. कोणतीही पळवाट काढणे, चांगले नाही. विदुराने भाजी खाऊन संतोष मानला आणि कौरवसभेतील अपमान सहन केला. जो अपमानित झाला, त्यास लंकेचे राज्य मिळाले.

आपले दुर्दैव पूर्वकर्माचा परिपाक असावे, अशी जाणीव झालेल्या भक्तांनाही श्री साईंनी खरा मार्ग दाखवून त्यांचा संसार सावरला. धर्मविचार जागृत करणे, हाच एक हेतू होता, असे नसून सर्वधर्मसमभावाने शिर्डीक्षेत्र प्रभावी करून साईबाबा जीवन्मुक्त झाले, तरी मानवतेचे कार्य अखंड चालू रहावे, ही भावना वृद्धिंगत झाली. शिर्डीत श्री साईंचे गुरुस्थान असल्यामुळे ते शक्ती-उपासनेचे धाम बनले. अशा संस्कारातून श्री साईभक्तांनी या स्थानाचे महत्त्व टिकविले आहे. संतकार्य समाजाला वळण लावते.

शिर्डीला साक्षात् परमेश्वराचा अवतार मानवरूपात लीला करीत असूनही न ओळखणारे, केवळ दर्शन घेऊन परत जाणारे अनेक असतात; परंतु श्री साईनाथ केवळ त्यांच्या मनांतील सद्भाव ओळखून कृपा करतात. श्रद्धा हा भक्तीचा स्थायीभाव आहे. संताच्या सान्निध्यात भगवंताची भक्ती करण्याची परम्परा सामाजिक मूल्यांवर अधिष्ठित आहे. सामान्यत: सर्वांना निर्गुण निराकाराच्या उपासनेपेक्षा सगुण साकाराची उपासना-भक्ती करणे सोईस्कर वाटते. क्रोधी मनुष्य जी भेदबुद्धी धरून भक्ती करतो, ती तामस भक्ती. सुख, प्रसिद्धी मिळविण्यासाठी सगुण मूर्तीची आराधना करतो, ती राजस भक्ती. निष्काम भावनेने कर्तव्य म्हणून भक्ती करतो, ती सात्विक भक्ती होय! असे भक्तीचे तीन प्रकार आहेत. सद्गुरु श्री साईंनी 'सगुणाचे आधारे निर्गुण पाविजे निर्धारें' ही सगुण सात्विक भक्तीची दिशा दाखविली. भक्त जिज्ञासू असेल, तर आत्मज्ञानाकडे वळतो. ज्ञानी-भक्तास उत्तम भक्त म्हटले आहे. असे अनेक साईभक्त आहेत.

गोदावरीच्या उगमापासून ती ज्या ठिकाणी सागराला जाऊन मिळते, त्या ठिकाणापर्यंत असलेली सर्व तीर्थे फिरुन परमयोगी साईनाथाने परत शिर्डीच्या एकांतात येऊन सर्वांसमक्ष स्वत:स जीवन्मुक्त केले.

# श्री साई शरणावली

साईनाथा तुज शरणम्
विश्वनाथा तुज शरणम्
दीनानाथा, रघुनाथा
सद्गुरुनाथा तुज शरणम्॥१॥

स्वरुपानंदा तुज शरणम्
परमात्मानंदा तुज शरणम्
चिदानंदा, चित्सुखनंदा
पूर्णानंदा तुज शरणम्॥२॥

कृपासागर तुज शरणम्
करुणासागर तुज शरणम्
ज्ञानसागरा, दयासागरा
चिलीमसोटाधर तुज शरणम्॥३॥

चिदंबरा तुज शरणम्
जगदुद्धारा तुज शरणम्
विश्वंभरा, दीनोद्धारा
पतितोद्धारा तुज शरणम्॥४॥

चिद्घनमुर्ते तुज शरणम्
अनादिमुर्ते तुज शरणम्
प्रकाशमुर्ते, कृपामुर्ते
तपोमुर्ते तुज शरणम्॥५॥

- सौ. गौरी सुधीर नाईक

# ''साई-श्रद्धा''

आयुष्याच्या बाजारात, वर्दळीत
''साई-श्रद्धा''
हीच बाजू होती
जमेची—
किती संपले
किती खर्चिले
तरी जाण नव्हती
रितेपणाची—
बाजार आटोपला तेंव्हा
पदरात माझ्या
पैसा मात्र, तांब्याचा
चमकत होता
''साई-श्रद्धेचा''!

- श्री. भालचंद्र गन्द्रे
ठाणे.

सूर्य अवघ्या पृथ्वीला आलोकित करतो. पण तेच एखादा लहानसा मेघ आड येऊन त्याला झाकून टाकील तर तोच प्रकाशस्वरूप सूर्यहि मग मायेच्या एका य:कश्चित आवरणामुळे आम्ही त्या सर्वव्यापी, सर्वसाक्षी सच्चिदानंदाला पाहू शकत नाही.

- श्रीरामकृष्ण-वाक्सुधा

# तुम्ही बाबांना काय द्याल ?

● बालसाईभक्तांनो, तुम्हाला मी हा प्रश्न विचारला तर असे आश्चर्याने पाहू नका. हा काही निरर्थक प्रश्न नाही. तुम्हाला मनात वाटत असेल की बाबा हे सर्वांना देणारे महोदार दाते. त्यांना आम्ही काय देणार ? जे काही द्यायचे ते फक्त बाबांनी आम्हाला द्यायचे. पण हे काही बरोबर नाही. देण्याची ही क्रिया फक्त एकतर्फी असू शकत नाही. देवसुद्धा घेतल्यावरच भक्तांना देतो. व्यवहारात तर घेण्यावाचून देणे नसते. यावरूनच देवाणघेवाण हा शब्द प्रचारात आला आहे.

● मित्रांनो, जर बाबा काहीच मागत नसते, तर मग त्यांनी शिरडीत भर दुपारी दारोदार भिक्षाटन का केले असते ? ''कोरभर वाढा गे भाकरी'' असे शब्द का उच्चारले असते. अर्थात ते कांही भाकरी मागत नव्हते. ते भक्तांची हृदये शोधीत होते. दक्षिणा मागतानाहि भक्तांची दानत तपाशीत होते व त्यांना अल्पसा त्याग करावयाची अमोल शिकवण देत होते.

● बाबा भक्तांचे कोड पुरवीत, त्यांच्या प्रार्थना वा नवस पुरे करीत त्यांच्या दुःखी जीवनात काही मदतीचा हात चमत्कारपूर्वक पुढे करीत. हे कां तर बाबांना जे हवे ते लोकांनी करावे यासाठी. परंतु गंमत अशी की आम्ही सर्व बाबांकडे काही ना काही सतत मागतच रहातो. बाबांनी कृपा केली की कृतज्ञतेने गहिवरतो. डोळ्यात पाणी आणतो. बाबा हे कल्पवृक्ष आहेत असे म्हणतो. बाबा आमचे गुरु, आम्ही त्यांचे शिष्य. बाबा आमचे देव, आम्ही त्यांचे भक्त अशा फुशारक्याही मारावयास कमी करीत नाही. खरोखरच आम्ही खरे भक्त नसतो की शिष्य नसतो. पुन्हा काहीतरी नवीन मागण्यासाठी त्याच्याकडे पसा पसरण्यासाठी नुसते निमित्त शोधीत असतो. बाबा आमच्याकडे काही मागत असतात हे आम्ही विसरतो किंवा त्याचेकडे जाणूनबुजून दुर्लक्ष करून हळूच आमची नवीन मागणी त्यांच्या पायाशी ठेवतो व ती त्यांनी पुरी करावी यासाठी त्यांच्यावर रुसतो, रागावतो.

## बाबांचे जीवन व संदेश

बाबा संकटाच्या काळी धावतात, मागितलेली मागणी पुरी करतात एवढे सर्वांना माहीत असल्याने सर्व धर्म पंथ जातीची माणसे बाबांकडे धावत येताना दिसतात.

बाबांकडे नवस करतात व तो शिरडी येथे येऊन फेडतात. बाबांच्या जीवनाचा, कृतीचा व उपदेशाचा अर्थ व संदेश जाणण्याचा ते कधीच प्रयत्न करीत नाहीत. बाबा आपल्याला सांगत आहेत की फक्त माझ्याकडे मागू नका व मागणे पुरे झाल्याची कृतज्ञता दाखवून गप्प बसू नका. तुम्ही माझ्या जीवनाचा अर्थ काय आहे, माझ्या शब्दांतून व कृतीतून कोणता संदेश व्यक्त होतो आहे, हे समजून घेण्याचा प्रयत्न करा. इतरांना तो समजू द्या व या संदेशाचे प्रत्यक्ष आचरण करून दाखवा. प्रत्यक्ष आचरणानेच माझ्याबद्दलची खरी भक्ति व कृतज्ञता व्यक्त होऊ शकेल. अन्यथा नाही.

### श्रद्धा व सबुरी

श्रद्धा व सबुरी या दोन पैशाची बाबा दक्षिणा मागत हे सर्वांना माहीत आहे. बाबांना श्रद्धा हवी होती व सबुरी हवी होती, याच्या अर्थाचे आपण कधी चिंतन करीत नाही. परमेश्वरावरची अविचल निष्ठा व त्याला सर्वस्व समर्पण असा श्रद्देचा अर्थ आहे. ही श्रद्धा बाणणे व आचरणे हे वाटते तेवढे सोपे मुळीच नसते. त्याचप्रमाणे व्यवहारात येणाऱ्या संकटानी व कठोर परिस्थितीने न डगमगता श्रद्धेने स्थिर रहाणे म्हणजे सबुरी. ही सबुरीहि आचरणे सोपे नाही. जर आपण श्रद्धा व सबुरी यांचा अर्थ नीट समजून आचरू शकत नसलो, तर आपण बाबांचे भक्त वा शिष्य होऊ शकू का? मग आपण भक्तीची वा शिष्यत्वाची पताका उगाच का मिरवावी? बाबा आपल्याला श्रद्धा, सबुरी या तत्त्वांबद्दल खोल चिंतन करावयास सांगतात. या सद्गुणांचे कृतीत, आचरणांत रूपांतर करा अशी मागणी करतात.

### बाबांची कर्म, भक्ति, ज्ञान साधना

बाबा आपल्याकडे मागतात की आपले आकुंचित विचार, कोता स्वभाव व जुने हट्ट सोडून आपण त्याग व सेवा यांची कास धरावी. स्वत: व स्वत:चा स्वार्थ या परिघातून मन बाहेर काढा व परोपकारी जीवन व निष्काम सेवा आचरा अशी बाबा मागणी करतात. हा बाबांचा कर्मयोग आहे. प्रत्येक कर्म पूजा म्हणून उदात्तपणे पार पाडून ते श्रीचरणी पुष्प म्हणून वहाणे हा बाबांचा भक्तियोग आहे. साई सर्वत्र भरला आहे. सर्व कृती, विचार, विकार साईपदी वहावे व सतत बुद्धीवर साईरुपाचा व नामाचा ठसा उमटवावा ही बाबांची ज्ञानसाधना आहे.

### बाबांचे अखेरचे मागणे

बाबांचे अखंड नामानुवर्तन करावे व बाबांच्या सुंदर रूपाचे सतत ध्यान करावे हे बाबांचे आपल्याकडे मागणे आहे. ही अखंड अनुसंधानाची अवस्था मिळविण्यासाठी आपले मन, बुद्धी, कर्म, श्वास आणि अहंकार बाबांच्या स्वरूपात लीन करणे अटळ

आहे. हेच बाबांचे अंतिम मागणे आहे. शिरडीत घरोघर भिक्षा मागताना बाबा केवळ कोरभर भाकरी मागीत नाहीत तर तुमचे सर्वस्व मागतात. बाबारूपी देव तुमच्या दाराशी आला आहे, असा क्षण पुन्हा परतुन येणार नाही. त्यांना सर्वस्व द्या. मन, बुद्धी, अहंकार त्यांच्या झोळीत टाका. हे बाबांचे मागणे आहे.

''असा क्षण फिरून परते न।
करावे सर्वस्वचि दान।।
बुद्धिमन अहंकार चित्त।
वहावे चरणि कृपावंत।।''

सूर्याची किरणें सर्व जागी समान पडली तरी पाण्यामध्ये, आरशांत व अन्य चक्क पदार्थांमध्ये जास्त लखलखतात. त्याचप्रमाणे भगवंताचा वास सर्वांच्या हृदयात सारखाच असूनहि साधु पुरुषांच्या हृदयामध्ये त्याचा प्रकाश जास्त दिसतो.

- श्रीरामकृष्ण-वाक्सुधा

साधनेच्या विश्वात - चकोर आजगांवकर

# दिव्य जीवनाकडे - १२

प्रत्यक्ष साक्षात्काराकडे -

या पूर्वीच्या पहिल्या सहा लेखांकात दिव्य जीवनाकडे जाण्याची आवश्यकता काय व त्याची प्राथमिक तयारी कोणती याचा ऊहापोह मी केला. जगातील दृश्य वस्तू व त्यांच्या लोभाचे बाह्य जग कसे फसवे आहे ते सांगितले. सत्ता, कीर्ति, पैसा, स्त्री ही आकर्षणे माणसाला प्रकाशापासून कशी दूर नेतात व अंधाराशी कशी बद्ध करतात हेहि सांगितले. दिव्य जीवनाचा प्रकाश मार्ग चोखाळण्यासाठी सतत कर्म, मन व बुद्धी यांचे शुद्धीकरण कसे आवश्यक असते याचे विवेचन केले. सूक्ष्मदेह शुद्ध करण्यासाठी या आंतरशुद्धीची पावले टाकलीच पाहिजेत. नाहीतर वासनासह पुनर्जन्म अटळ आहे, हे पटविले. अशा प्रकारे जाणीव शुद्ध केल्यावर परमेश्वराशी सुसंवाद ठेवल्यास अहंकार शुद्ध होऊन देवाचा हृदयात प्रवेश होतो, हेहि स्पष्ट केले. ही दुसरी अवस्था साधनेच्या विश्वात शिरण्याची आहे.

साधनेसाठी वेगवेगळ्या थोर महात्म्याचे सिद्धांचे विचार प्रबोधनासाठी ८ ते ११व्या लेखांकात मांडले. नामस्मरणवाद्यांचे ज्ञानमार्गीयांचे भक्तिवाद्यांचे, योगमार्गीयांचे विचारहि यात विस्ताराने मांडले. दत्तपंथ, नाथपंथाच्या विचारांच्या संदर्भात आधुनिक संत व योगी बाबामहाराज आर्वीकर, प्रा. बेलसरे, सत्यसाईबाबा इत्यादींचे उद्‌बोधक साधना व जीवनावरील विचार आलेख वाचकाच्या मन:पटलापुढे सुगम शब्दात चितारला. येथवर वाचकांना जीवनातील खऱ्याखुऱ्या मूल्यांची जाणीव झाली असेल. साधनेचे स्वरूप व महत्त्वहि समजले असेल. आता दिव्य जीवनाकडे जाण्याच्या मार्गाचे प्रत्यक्ष विवेचन पुढील काही लेखांकात लेखकाने स्वत:ची साधना व अनुभव तसेच ज्ञानेश्वरी, गीता, भागवत, कबीरसाधना, गुरुगीता, राजयोग, पातजलयोग इत्यादींची वाट पुसत वाचकापुढे सादर करण्याचे योजिले आहे. या आधी साक्षात्कारी पुरुषांचे अनुभव पाहू.

**साक्षात्काराचे साक्षात् वर्णन**

**पॉल ब्रंटन:** चित्त शुद्ध झालेल्या साधकाला महात्म्याच्या गुरुकृपेमुळे फार लवकर दिव्य जीवनाचें अनुभव येतात. विदेशी विद्वान पॉल ब्रंटन यांना रमण महर्षीच्या

दृष्टीपातानं आलेला अनुभव पुढे देत आहे. "रमण महर्षी हे कोणताहि वाद न घालता काही दिव्य दान करण्यास आलेले महात्मे आहेत. मी त्यांच्या समोर एकाग्र होतो. त्या शांततेत सभोवतालचे ज्ञात जग एखाद्या छायेसारखे विरघळू लागले. आत एक प्रचंड शक्ति आल्याचा भास होत आहे. मी बुद्धी, विचार, जाणीव यापासून वेगळा असल्याचा अनुभव येतो आहे विचारशक्तिची आंदोलने मी अलिप्तपणे पहात आहे, मेंदूच्या कक्षेतून मी बाहेर पडलो आहे व विचाराची आवर्तने साक्षीपणे लक्षीत आहे. विचाराच्या मूळाशी मी शून्य बिंदूवर आलो आहे. शरीराच्या इंद्रियाचा आता मजवर असर पडत नाही. मी विश्वाच्या रहस्याच्या सीमेवर उभा आहे. मेंदूच्या क्रिया स्थगित झाल्या आहेत. स्वतंत्र अस्तित्त्वाच्या कोत्या कक्षेतून जाणीव बाहेर पडून विश्वात्मकतेच्या मोकळ्या हवेत आली आहे. एका पळातच मी अवकाशात घडणाऱ्या गूढ नाट्याच्या अर्थाला जणु स्पर्श करीत आहे. 'मी' म्हणणाऱ्या अस्तित्त्वाची नवी जाणीव पवित्र आनंदात डुंबली आहे. कालच्या कटु स्मृती व उद्याच्या चिंता पूर्ण ओसरल्या आहेत. मला दैवी मुक्ती मिळाली आहे व मी सर्व सृष्टीला प्रगाढ करुणेने सहजपणे आलिंगत आहे. मी मुक्त आहे. विचाराहून थोर अंत:प्रेरणेची हृदयातील साद मी ऐकतो आहे. जीवनाचे लपलेले सत्य व न्यायाचा आवाज आम्ही एरव्ही पाहू शकत नाही, ऐकू शकत नाही व मनाला अज्ञानाच्या गांठी घालीत बंधनात पडतो आहोत. जीवनातील सुखदु:खामागील महान् प्रकाशाची प्रभात पहाण्याचा आपण प्रयत्न करीतच नाही."

**आद्य शंकराचार्य:** त्रिकुट शिखरावरील आकाशात प्राणवायू स्तंभित करण्यासाठी केवलकुंभकाचा उपयोग केल्यावर इडापिंगला नाड्या सोडून प्राण मनासह लय पावतो. सर्व इंद्रियवृत्ति शून्य होतात.

नेत्र उन्मेष निमेष वर्जित झाले आहेत. वायु रेचक पूरक करीत नाही. मन संकल्प-विकल्प करीत नाही, अशीही उन्मनी अवस्था आहे. अमनस्क मुद्रेत श्वासोश्वासाची आंदोलने अदृश्य झाली आहेत. तेच अर्धोन्मिलित झाले आहेत. अशी अमनस्क मुद्रा साधकांनी प्रकट करावयास हवी. संकल्प-विकल्प विछिन्न होऊन कर्मजाल नष्ट झाले, निरंतर प्रत्यग् विमर्शाने योगनिद्रेची तंद्रा अनुभवास येते. साधक तुरीयेच्या गादीवर निद्रा करतो. (योगतारावलि)

हे शंकराचार्यांचे विवेचन केवलकुंभकाने प्राणनिरोध करून मनोलय करताना होणाऱ्या अवस्था दाखवीत असून योगनिद्रा व नंतरची उन्मनी अवस्था हा दिव्य अनुभव असल्याचे त्यांनी सांगितले आहे.

**संत तुकाराम :** तुकाराम साक्षात्काराचे वर्णन करताना प्राण पेंगुळलेला आहे असे सांगतात. याचा अर्थ प्राणाचे चलन मंद झाले आहे. अमृताची खूण समजली आहे. नेत्र तेजाने पुंजाळून उन्मीलित झाले आहेत. कंठ दाटला असून शरीराला आनंदाचा रोमांच फुटला आहे. चित्त स्वरूपाला चिकटले आहे. आत बाहेर जाऊ शकत नाही. नील प्रकाश फुलला आहे. जणु पहाट फुटली असून सत्रावी जीवनकला अमृतवर्षत आहे. सूर्यचंद्र एक होऊन जीव शिवाशी झटला आहे. आनंदाच्या डोही आनंद दाटला आहे. सुखामध्ये डुंबत असल्याने निश्चित होऊन मन उन्मनीत विरले आहे. देशकालवस्तूचे भान मिटले आहे. आत्मा विश्वात्मक व्यापक झाला आहे. अहं सोऽहं एक होऊन प्रपंचाचा निरास झाला आहे. अज्ञानाने झाकलेली हृदयातील ज्योतिरूप ब्रह्म प्रकट झाले आहे. याच अनुभवासाठी आयुष्यभर मी सायास केले आहेत.

**संत आर्वीकर महाराज :** निर्मल प्रकाश. कालातीत स्थानातीत प्रकाश. देव आत बाहेर भरून उरला आहे. मनच मौनावले, उन्मनीच्या दारात भक्तराज उभा आहे. मूलप्रकाशाचा दिव्य नीलिमा. जुने विश्व मावळले, नवे प्रकाशले. जन्म-मरण संपले. अमृतत्व उगवले. आपला एकपणा न मोडता आत्मा सर्व जीवातील अहंकृत संवेदना अनुभवतो. देवभक्त गुरुशिष्य येथे एक झाले आहेत. भक्त चकोर प्रभुरुपी चंद्र बनला आहे. सालोक्य, सामीप्य, सारुप्य व सायुज्य या चारहि मुक्ती या सामरस्यभावात एकवटल्या आहेत.

या दिव्य अनुभवाच्या आलेखानंतर आता आपण आपल्या साधनेच्या सुगम पंथाचे संशोधन वेगळेपणाने करू या.

(पुढील अंकात चालू)

**रिकाम्या घड्यात पाणी भरत असताना भक्‌भक्‌ आवाज होतो, परंतु तोच भरल्यावर मग आवाज होत नाही, त्याचप्रमाणे ज्याला भगवंताचा लाभ झालेला नाही तोच भगवंतासंबंधी वितंडवाद करीत असतो. ज्याला त्यांच्या दर्शनाचा लाभ झालेला असतो तो शांत मनाने ब्रह्मानंदाचा उपभोग घेत राहतो.**

**- श्रीरामकृष्ण-वाक्सुधा**

# श्री.माधवराव बळवंत (बाबांचा शाम्या) देशपांडे शिरडीकर यांचे अल्प चरित्र

(श्री साईलीला, शके १९६२ कार्तिक अंकावरुन)
(मागील अंकावरुन पुढे चालू)

## बाबांना माधवरावांचे वेड

''पढविलें पाखरू ऐसे न बोले। या परी क्रीडामृग ही तैसा न चले॥
कैसे देव येथे सुरवाडले। ते जाणों नये॥१७०॥
आजि परब्रह्म हे सगळें। भोगावया सदैव याचेच डोळे॥
कैसे वाचे चे हन लळे। पाळीत असे.॥१७१॥
हा कोपे की निवांत साहे। हा रुसे तरी बुझावीत जाये॥
नवल पिसें लागले आहे। पार्थाचे देवा॥१७२।

श्री. ज्ञा. अ. ११

## रात्री बेरात्री माधवरावांना श्री द्वारकामाईत बाबाकडे जाण्याची केव्हाही बंदी नव्हती

सायंकाळ झाली की ३-४ विवक्षित भक्तांखेरीज इतरांना श्री द्वारकामाईत जाण्याची बाबाकडून सक्त बंदी असे परंतु माधवरावांना मात्र मोकळीक असे. श्री तात्यासाहेब तूलकर यांचे देहावसानसमयीं आपल्यास बाबांच्या चरणाचे तीर्थ मिळावे अशी इच्छा तात्यासाहेबांनी प्रदर्शित केली. ज्यावेळी रात्रीचा १-२ वाजण्याचा समय मशिदींत बाबाकडे त्यावेळी जाणार कोण? माधवरावांनी कमर बांधली. व पंचपात्रीत पळी व पाणी घेऊन मशिदीत गेले. बाबा जाग्यावरून उठून कोण आहे म्हणून ओरडले. मी श्यामा आहे असे माधवराव म्हणाले. या वेळी इथं आलास? असे म्हणत, शिव्या देत, मारण्याच्या आवेशाने ओटयाच्या काठांवर एक पाय पुढे करून बाबा उभे राहिले

तात्यासाहेबाचा प्राण चालला आहे आन् तो तुझ्या पायाचं तीर्थ मागतोय देवा. देशि लवकर तीर्थ. बाबा नाही म्हणतच आहेत. माधवराव धिटाईने पुढे सरकतच होते. पण बाबांनी जरी नरसिंह अवताराचे सोंग घेतले तरी तीर्थ देण्याकरतां पायाचा अंगठा पुढे करून ठेविलाच होता. माधवरावांनी तसाच बाबांचा अंगठा पंचपात्रीतील पाणांत बुडवून घेतला. व तात्या साहेबांची शेवटची इच्छा पुरी केली.

अर्जुना संबंधाने श्री ज्ञानेश्वर माउली एके ठिकाणी लिहितात तसेच हे झाले.


'म्हणोनी बहु दिवस वोळगावा। कां अवसरू पाहोनि विनवावा॥
हा ही सोस तया सदैवा। पडेचि ना'॥१३८॥ श्री. ज्ञा. अ. ६
'जैसे मातेच्या ठायी। आपल्या अनवसरू नाही॥
स्तन्यालागोनि पाही। जिया परी॥२९॥ श्री. ज्ञा. अ. ३

आई जवळ कोठे व काही बोलण्याला व वेळी अवेळी स्तन्य (अंगावरील दूध) मागण्याला जशी बालकाला बंदी नसते तसेच माधवरावाना बाबांजवळ केव्हाही व कोठेही बोलण्याला व काहीही मागण्याला व बाबांकडे जाण्याला बंदी नव्हती. बाबांकडे रात्री जाण्याला व दिवसा त्यांचे जेवणाचे वेळी त्यांचेकडे जाण्याला त्यांनी नेहमीची २-४ माणसे खेरीज करून सर्वांना बंदी असे. पण माधवरावांना ती केव्हाच नव्हती.

## माधवरावांवरील बाबांचे अकृत्रिम व अवर्णनीय प्रेम

बाबांनी माधवरावाना जरी विपुल संपत्ती दिली नाही, तरी माधवरावांवरील बाबांचे प्रेम अवर्णनीय होते यांत तिलमात्र शंका नाही, एखादे भक्ताने बाबांचे आपणास प्रसाद मिळावा या हेतुने एखादी प्रिय वस्तु बाबांचे हातांत घ्यावी व बाबांजवळून ती परत मागावी. श्याम्या ही ठेव तुला असे म्हणून बाबांनी ती वस्तु (श्री एकनाथी भागवताची पोथी, श्री विष्णु सहस्त्रनाम, चांदीच्या बाबांच्या पादुका, बाबांची शाडूची सुंदर मूर्ती वगैरे वगैरे) माधवरावास द्यावी.

तसेच दररोजच्या दुपारच्या नानाविध नैवेद्यान्नाचा काला करून बाबा सर्वांना वाटून देत पण माधवराव तो सबगोलंकृत काला खाणार नाहीत हे समजून बाबा, श्री. द्वारकामाईतील सर्वांचे काला भोजन आटोपल्यावर माधवरावांना हापूसच्या आंब्याच्या फोडीनी भरलेली बशी नित्यनेमाने दररोज देत.



# मे १९९० - विशेष


भारतीय परंपरेत सण, व्रत-वैकल्ये, पुण्यदिवस इत्यादींना विशेष महत्त्व आहे. तसेच सर्व धर्मीयांनाही त्याचे महत्त्व वाटते. या दृष्टिकोनातून प्रत्येक महिन्यातील महत्त्वाचे सण, व्रते, पुण्यदिवस, जयंत्या, इ. माहिती देण्याचा उपक्रम सुरु करीत आहोत. आमच्या प्रिय साईभक्तांना हा उपक्रम आवडेल अशी आशा आहे.

कार्यकारी संपादक

| तारीख | वार | | विशेष |
|---|---|---|---|
| १ | मंगळवार | – | महाराष्ट्र दिन, मे-दिवस, गंगोत्पत्ति |
| २ | बुधवार | – | बुधाष्टमी |
| ३ | गुरुवार | – | सीता नवमी |
| ५ | शनिवार | – | मोहिनी एकादशी, मीनाक्षी कल्याणम् |
| ६ | रविवार | – | मधुसूदन पूजा |
| ७ | सोमवार | – | सोम-प्रदोष, रविन्द्रनाथ टागोर जयंती |
| ८ | मंगळवार | – | नृसिंह जयंती |
| ९ | बुधवार | – | बुद्ध पूर्णिमा |
| ११ | शुक्रवार | – | सूर्याचा कृत्तिका नक्षत्रात प्रवेश |
| १३ | रविवार | – | संकष्ट चतुर्थी |
| १४ | सोमवार | – | रवि वृषभराशीत प्रवेश |
| २० | रविवार | – | अपरा स्मार्त एकादशी |
| २१ | सोमवार | – | अपरा भागवत एकादशी |
| २२ | मंगळवार | – | भारतीय ज्येष्ठ, भौमप्रदोष |
| २३ | बुधवार | – | शिवरात्रि |
| २४ | गुरुवार | – | भावुका अमावास्या, शनैश्चर जयंती |
| २५ | शुक्रवार | – | ज्येष्ठ महिना प्रारंभ, दशहरा, करिदिवस, सूर्याचा रोहिणी नक्षत्रात प्रवेश |
| २६ | शनिवार | – | रंभा तृतीया, जिल्काद |
| २७ | रविवार | – | विनायक चतुर्थी, राणा प्रताप जयंती |
| २८ | सोमवार | – | श्रुत पंचमी |
| २९ | मंगळवार | – | अरण्यषष्ठी, विन्ध्यवासिनी पूजा |
| ३१ | गुरुवार | – | शुक्लादेवी पूजा |

# श्री साईबाबा संस्थान, शिरडी
# श्री साईबाबा संस्थान प्रकाशित पुस्तकांची यादी

| पुस्तकाचे नांव | भाषा | किंमत | पॅकींग व पोस्टेज |
|---|---|---|---|
| श्री साई सत्‌चरित | मराठी | ३१-०० | ९-०० |
| –"– | इंग्रजी | १२-५० | ६-५० |
| –"– | हिंदी | १६-७५ | – |
| –"– | गुजराथी | १९-०० | ६-५० |
| –"– | कन्नड | १३-५० | ८-०० |
| –"– | तेलगु | १९-०० | ८-०० |
| –"– | तामीळ | – | – |
| –"– | सिंधी | २२-०० | ७-५० |
| श्री साईसत्‌चरित पोथी | गुजराथी | ३१-०० | १०-५० |
| श्री साई लिलामृत | मराठी | ९-०० | – |
| –"– | हिंदी | ११-०० | – |
| –"– | गुजराथी | ६-६५ | ४-०० |
| अवतार व कार्य | मराठी | ४-२५ | – |
| स्तवन मंजिरी | मराठी | ०-६५ | ३-५० |
| –"– | हिंदी | १-१५ | ३-५० |
| –"– | गुजराथी | ०-९० | ३-५० |
| सगुणोपासना (आरती) | मराठी | ०-७० | ३-५० |
| –"– | हिंदी | १-२५ | ३-५० |
| –"– | गुजराथी | ०-९५ | ३-५० |
| –"– | तेलगु | ३-५० | ५-५० |
| –"– | सिंधी | १-२५ | ३-५० |
| दासगणूकृत ४ अध्याय | मराठी | १-८५ | ३-५० |
| सचित्र साईबाबा | मराठी/इंग्रजी | ६-८० | ५-५० |
| मुलांचे साईबाबा | मराठी | १-५० | – |
| –"– | इंग्रजी | १-८५ | – |
| –"– | हिंदी | १-५० | – |
| –"– | गुजराथी | १-६५ | ३-५० |
| –"– | तेलगु | २-०० | – |
| रुद्राध्याय (अ. ११ वा) | मराठी | १-१५ | ३-५० |
| साई दि सुपरमॅन | इंग्रजी | ६-०० | ४-०० |
| साईबाबा ऑफ शिर्डी (भरुचा) | इंग्रजी | ४-५० | ४-०० |
| साईबाबा ऑफ शिर्डी (प्रधान) | इंग्रजी | ३-५० | ४-०० |
| रघुनाथ सावित्री भजनमाला | मराठी | १५-२५ | ४-५० |
| स्तवनमंजरी | इंग्रजी | १-१० | ३-५० |
| शिरडी डायरी (खापर्डे) | इंग्रजी | ९-५० | ४-५० |





श्री

# साईलीला

श्री साईबाबा संस्थान
शिरडीचे अधिकृत मासिक
श्री साईबाबांच्या
दिव्य संदेशाचा प्रसार

***********************************

६१ वे) जून १९९० (अंक ३ रा

भारतीय ज्येष्ठ शक १९१२

***********************************

संपादक

के. पं. क्षीरसागर

कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान, शिरडी

★ कार्यकारी संपादक ★

डॉ. वि. वा. सातपूरकर

शास्त्री, एम्.ए., पीएच्. डी., पंचांगकर्ता

–: कार्यालय :–

पोस्ट – शिरडी – ४२३१०९, जिल्हा – अहमदनगर.

साईनिकेतन, ८०४ बी, डॉ. आंबेडकर रोड, दादर, मुंबई-४०० ०१४.

दूरध्वनि – ४१२ २५ ६१

– वर्गणी –

वार्षिक – रु. १०• परदेशीय रु. ११५ तहहयात – रु. ३००

(टपाल खर्चासहित)

किरकोळ अंक – रु. २

---

या मासिकात प्रकाशित झालेल्या मतांशी संपादक सहमत आहेतच असे नाही

---

# श्री साईबाबा संस्थान, शिरडी


## विश्वस्त मंडळ

अध्यक्षा

**डॉ. लेखा पाठक**

श्री. हेमराज शहा
श्री. ब्रिजमोहन भामशा
श्री. शिवराम शिंदे
डॉ. एकनाथ गोंदकर
श्री. भीमाशंकर खांबेकर
श्री. दादासाहेब रोहमारे (पाटील)
श्री. उत्तमराव शेळके
श्री. कारभारी देवकर
श्री. मोतीराम पवार
प्रा. ना. स. फरांदे
श्री. दिलीप अ. शिंदे
श्री. श्रीपतराव जाधव

श्री. मनोहर गोगटे
श्री. पृथ्वीराज रा. आदिक
श्री. राजीव प्र. कुळकर्णी
श्री. प्रभाकर तु. बोरावके
श्री. बाबुराव नरोडे (पाटील)
श्री. प्रभाकर बी. बोरावके
श्री. सोपान धोरडे
श्री. अनंतकुमार पाटील
श्री. प्रशांत व्यं. हिरे
श्री. अण्णासाहेब म्हस्के
श्री. गोपिनाथ ब. कोते (पाटील)
श्री. मोहन मो. जयकर

वर्ष ६९ | जून १९९० | अंक ३

ज्येष्ठ शालिवाहन शक १९१२
शिवशक ३१७, विक्रमसंवत् २०४६
हिजरी १४१० फसली १३५९

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १. रघुनाथ-सावित्री साईनाथ भजनमाला | – | ४ |
| २. सुविचार | – | ५ |
| ३. संपादकीय | – | ६ |
| ४. नियोजित 'साईबाबा भक्त निवास'च्या भूमिपूजन समारंभाचे टिपलेले क्षण | – | ८ |
| ५. नियोजित 'साईबाबा भक्त निवास'च्या भूमिपूजन समारंभाचा वृत्तांत | – | ११ |
| ६. श्री साई मंदिर परिसराचा अल्पावधीतच सर्वांगीण विकास | – | १८ |
| ७. श्री गुरुपौर्णिमा उत्सव-सन-१९९० अखंड पारायण पद्धत | – | २३ |
| साईभक्तांचे अनुभव | – श्री. श. बा. पटवर्धन | २४ |
| ग्रीष्मऋतु-आहार विहार | – वैद्य किरण पां. भावे | ३४ |
| श्री साईंचे सत्य चरित्र, अध्याय ६वा | – श्री. मु. बा. निंबाळकर | ३६ |
| दिव्य जीवनाकडे | – श्री. चकोर आजगांवकर | ४३ |
| विष्णुसहस्रनाम | – | ४७ |
| "नाद-ब्रह्म" | – श्री. सुरेन्द्र देसाई | ४९ |
| थोर साईभक्त कै. अण्णासाहेब दाभोलकर | – सौ. मीनाक्षी दाभोलकर | ५१ |
| नामस्मरण | – सौ. प्रविणा कांबळी | ५३ |
| हितगुज | – | ५६ |
| जून १९९०-विशेष | – | ५७ |
| श्री. माधवराव बळवंत (बाबांचा शाम्या) देशपांडे शिरडीकर यांचे अल्प चरित्र | – | ५८ |



# रघुनाथ सावित्री साईनाथ भजनमाला

१११

नको दाखवाया नको भुलवाया। घेंई स्वहिता या सांईनाम॥
सुलभ वचनीं नाहीं तें बिकट। करीं बा निकट जीवालागीं॥
अहर्निशींलावीं मना तूं संवय। सार्थकचि होय जन्माचें तें॥
नको नको मान दंभ धन जनीं। करीं निज मनीं ध्यान त्याचें॥

११२

बाळपण गेलें खेळत रांगत। छत्र माय तात शिरावरी॥
तरुणपणाची धुंदी अनिवार। भार्येसी अंतर ओपियेलें॥
विसरुनि गेला आप्त कुळ गोत। रंजवी मनांत भाव तिचे॥
सौख्याची पुतळी हृदया भिडली। स्वार्था झगडली पतीसंगें॥
पाशांत गुंतला आपण होऊनी। ध्यानीं मनीं स्वप्नीं उभी दिसे॥
बनला गबरु विषयांध झाला। कर्तव्या मुकला दास म्हणे॥

११३

पाय पाहूनियां लोभ मना झाला। भवीं सांपडला नावाडी तो॥
आवड ती देई शुद्धभावनेची। तयानें जिवाची सोय होई॥
मन स्थिर नाहीं चिंती सैरावैरा। बाईचा तो फेरा येई आड॥
दासाचें मागणें जाणतो एकला। सांई शंकर भोळा गुरु माझा॥

# सुविचार

कालो वा कारणं राज्ञ:
राजा वा कालकारणम्।
इति ते संशयो मा भूत्
राजा कालस्य कारणम्।।

—महाभारत, शांतिपर्व, अध्याय ७०-६

शरपंजरी पहुडलेले भीष्मपितामह युधिष्ठिराला राजधर्म समजावून सांगत होते. त्यावेळी त्यांनी राजा व काळ यांचे नाते सांगणारे चिरंतन सत्य सांगितले—

"युधिष्ठिरा, काळ राजाला घडवितो वा राजा काळ निर्माण करतो याबद्दल तुझ्या मनात अजिबात संशय निर्माण व्हायला नको. राजा हाच काळ घडवत असतो."

—महाभारत, शांतिपर्व, अध्याय ७०-६



# ऋग्वेदातील मंगलाचरण



ॐकारश्चाथ शब्दश्च द्वावेतौ ब्रह्मण: पुरा।
कण्ठंभित्वा विनिर्यातौ तस्मान्मांगलिकावुभौ।।

– नारदपुरा

मंगलाचरणाची परंपरा फार प्राचीन असल्याचे आम्ही नमूद केले होते. ते किती प्राचीन आहे याचा मागोवा घ्यायचे म्हटले तर या जगातील प्राचीनतम व आद्य ग्रंथ ऋग्वेदाकडे वळावे लागेल. ऋग्वेद हा या विश्वातील सर्वात जुना असा उपलब्ध ग्रंथ आहे. जुने ग्रंथ अनेक असू शकतात. पण ऋग्वेदाची नोंद प्रथम घेण्याचे मुख्य कारण म्हणजे गेली हजारो वर्षे हा ग्रंथ जसाच्या तसा पिढ्यान पिढ्या आजतागायत उपलब्ध आहे. आणि ही गोष्ट पाश्चात्य देशातील विद्वानांनी मान्य केलेली आहे. याची बरोबरी करणारा दुसरा प्राचीन ग्रंथ उपलब्ध नाहीं.

## - ऋग्वेदाची प्राचीनता -

आजच्या इतिहासाला वा इतिहासकारांना काळाची निश्चिती हा महत्त्वाचा प्रश्न वाटतो. अमुक ग्रंथ वा ग्रंथकार केव्हा झाला हा त्यांचा एक मूलभूत मुद्दा असतो. ऋग्वेदासारख्या जगन्मान्य ग्रंथाबद्दल तर हा प्रश्न जीवन-मरणाचा वाटल्यास नवल नाही. पण आपणास त्यासंबंधी विशेष स्वारस्य नाहीं. महत्त्वाचा असला तरी मंगलाचरणाकरिता जेव्हढी गरज आहे तेव्हढी माहिती आपण करून घेऊ या.

ऋग्वेदाचा काळ हा सर्वानुमते इसवी सनापूर्वी १५०० वर्षे म्हणजे आजच्या काळापासून सुमारे ३५०० वर्षे पूर्वीचा असावा. याच्या अलिकडे येणे अवघड आहे. पण या काळापूर्वी म्हणजे सुमारे दहा हजार वर्षे तरी असावा असे कांही विद्वानांचे मत आहे. पार्गिटर, जेकोबी, मॅक्डोनेल यासारख्या आंग्ल पंडितांनी व शं. बा. दीक्षित यांनी ज्योतिर्गणिताच्या आधाराने तसेच अन्य भारतीय विद्वानांनी या विषयावर मौलिक संशोधन करून ऋग्वेदाचा काळ ठरविला आहे. आपण हा विषय त्यातल्या तज्ज्ञांकडे सोपवून देऊ कारण काल हा आपल्या जीवनात अतिशय मर्यादित असल्याने आपल्यापुरता आपण तो तसाच ठेवू म्हणजे ऋग्वेद हा प्राचीन आहे एव्हढेच लक्षात ठेवू.

## - ऋग्वेदाची मांडणी -

ऋग्वेद हा संपूर्ण पद्य ग्रंथ आहे. प्राचीन असून विशालही आहे. यात एकूण १०२८ काव्ये व दहा हजार कडवी आहेत. या काव्यांना 'सूक्त' व कडव्यांना 'ऋचा' म्हणतात हे आपणास माहीत आहेच. यांची विभागणी दहा मंडळात किंवा आठ अष्टकात अशी दोन प्रकारे केलेली आहे. तसेच यातील ऋचा वा मंत्र म्हणण्याची विशिष्ट पद्धति आहे. या पद्धतीत हजारो वर्षे जाऊनही अजिबात फरक पडलेला नाही हें आश्चर्य आहे. लिहिण्याची वा छापण्याची कला ही अलिकडच्या काळात प्रचलित झालेली आहे. भारतात मात्र हा ग्रंथ मुखोद्गत करून वंशपरंपरेने ते जतन करण्यात आलेले आहेत. आक्रमणातून ही परंपरा टिकली आहे.

## - स्वरूप -


ऋग्वेदातील सूक्ते ही निरनिराळ्या देवतांना उद्देशून स्तुतिरूपाने केलेली आहेत. देवता प्रामुख्याने निसर्गदेवता आहेत. उदा. अग्नि, सूर्य, वरूण, वायु, इन्द्र इत्यादि. या देवतांना यज्ञाद्वारे आवडीचे पदार्थ अर्पण केले आहेत. त्यांचा स्वीकार व्हावा ही प्रार्थना केलेली आहे. देव-देवतांना त्यांच्या प्रचंड शक्तीची व केलेल्या अचाट कृत्यांची आठवण करून दिलेली आहे. आपल्या मागण्या पुढे मांडल्या आहेत. त्या पूर्ण कराव्यात म्हणून विनवणी केलेली आहे. पूर्वी त्यांनी असे दिलेले आहे याचे स्मरण देऊन आम्हालाही द्यावे म्हणून साकडे घातलेले आहे.

देवतांची स्तुती प्रामुख्याने असली तरी त्यात इतर विषय आलेले आहेत. दानाचे महत्त्व वर्णन करणारे भिक्षुसूक्त (१० वे मंडळ) असून दान करणाऱ्या दात्याची स्तुती त्यात आहे. विश्वामित्र ऋषि विपाशा आणि शुतुद्रि या नद्यांना सांगताहेत की भरताजाची वाहने सुखरूप तडीपार होऊ दे. (३ रे मंडळ). औषधी सूक्तात वनस्पती व त्यांच्या गुणधर्मांची वर्णने आहेत (दहावे मंडळ) रोग बरे व्हावेत म्हणून प्रार्थना आहेत. पुरुरवा-उर्वशीची कथा आहे. सूर्या-विवाह सूक्त त्या काळातील विवाहसंस्थेचे स्वरूप दर्शविते. पर्जन्य, बेडूक, जंगले, एवढेच काय एका हरणाऱ्या जुगाऱ्याचे दैन्य रेखाटलेले आहे. विश्वनिर्मितीबद्दलचे 'पुरुष-सूक्त' तर प्रसिद्धच आहे. अनेक सामाजिक विषयही यात आलेले आहेत. त्या काळाचे प्रतिबिंब निरनिराळ्या सूक्तांमध्ये पडलेले दिसते. विषयवर्णने प्रांजलपणे केलेली आहेत.

(क्रमशः)

**- डॉ. वि. वा. सातपूरकर,**
कार्यकारी संपादक

## नियोजित 'साईबाबा भक्त निवास' च्या भूमिपूजन समारंभाचे टिपलेले क्षण



डावीकडून बसलेले – श्री. व सौ. शकरराव कोल्हे, श्री. रामराव आदिक, श्री. ल. रं. हातणकर, डॉ. लेखा पाठक, श्रीमती पुष्पाताई हिरे - डावीकडून उभे - अॅड. धोरडे, श्री. खांबेकर, श्री. अण्णासाहेब म्हस्के, श्री. नरोडे, श्री. मोतीराम पवार



डावीकडून बसलेले – श्री. रामराव आदिक, डॉ. लेखा पाठक – डावीकडून उभे – श्री. नरोडे, श्री. प्रभाकर बी. बोरावके, श्री. खांबेकर, श्रीमती पुष्पाताई हिरे, श्री. ल. रं. हातणकर, श्री. श्रीपतराव जाधव, श्री. व सौ. कोल्हे, श्री. पी. टी. बोरावके, श्री. गोपीनाथ कोते पाटील




प्रज्वलन प्रसंगी डावीकडून - डॉ. लेखा पाठक, श्री. कोल्हे, श्री. रामराव आदिक



भाषणात श्रोत्यांना संस्थानच्या कामकाजाविषयी माहिती देताना डॉ. लेखा पाठक




व्यासपीठावर डावीकडून पहिली रांग - श्री. हातणकर, श्री. आदिक, श्रीमती पुष्पाताई हिरे, श्री. व सौ. कोल्हे - दुसरी रांग - श्री. मोतीराम पवार, श्री. पी. टी. बोरावके, श्री. गोपीनाथ कोते पाटील, श्री. गोंदे, श्री. खांबेकर - तिसरी रांग - डॉ. गोंदकर, श्री. प्रभाकर बोरावके, श्री. नरोडे - चौथी रांग - श्री. हेमराज शाह, श्री. श्रीपतराव जाधव, श्री. राजीव कुलकर्णी



नियोजित "साईबाबा भक्त निवास"

# "बाबांची शिकवण आचरणात आणण्याची आज खरी गरज"

- मा. श्री. रामराव आदिक,
अर्थ व नियोजन मंत्री

भक्तांच्या निवासाकरिता बांधण्यात येणाऱ्या "साईबाबा भक्त निवास" ह्या नियोजित इमारतीचा भूमिपूजन समारंभ दिनांक ४ मे १९९० रोजी शिरडी येथे महाराष्ट्र राज्याचे वित्त व नियोजन मंत्री मा. श्री. रामराव आदिक यांच्या शुभहस्ते सम्पन्न झाला. ह्या समारंभाचे अध्यक्षस्थान सार्वजनिक आरोग्य व सांस्कृतिक मंत्री मा. श्रीमती पुष्पाताई हिरे यांनी भूषविले. सहकार व दारूबंदी मंत्री मा. श्री. शंकरराव कोल्हे प्रमुख पाहुणे म्हणून, तर बांधकाम राज्यमंत्री मा. श्री. ल. र. हातणकर सन्माननीय पाहुणे म्हणून उपस्थित होते.

अर्थ व नियोजन मंत्री श्री. रामराव आदिक यांनी वर्तमान विश्वस्त मंडळाने गेल्या सात महिन्यांत केलेल्या उल्लेखनीय कार्याबद्दल प्रशंसोद्गार काढले व सर्वसामान्यांना परवडेल अशा "साईबाबा भक्त निवासा"ची योजना मंडळाने हाती घेतल्याबद्दल मंत्री महोदयांनी विश्वस्त मंडळ सदस्यांना धन्यवाद दिले. ते आपल्या भाषणात पुढे म्हणाले की, "महाराष्ट्र ही संतांची भूमि आहे. साईबाबा, मेहेरबाबा, उपासनी महाराज यांची नगर जिल्हा ही कर्मभूमि आहे. येथेच ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरी लिहिली. अशा हया पुण्यवंतांच्या भूमीत मंगलमय, पवित्र वातावरण निर्माण करण्यासाठी संस्थान अनेक योजना राबविणार आहे, मंदिराचे सुशोभिकरण करणार आहे, हे ऐकून आनंद झाला. यामुळे राज्यातीलच नव्हे, तर देश–विदेशांतील पर्यटकांचीही गर्दी येथे होईल."

"येथे एक मागणी करण्यात आली की, शिरडी गावातून जो महामार्ग जातो, तो गावाबाहेरुन काढण्यात यावा. रहदारी वाढल्याने त्या महामार्गाचा त्रास होत आहे. हा महामार्ग गावाबाहेरुन काढण्यासाठी नाशिकच्या विभागीय आयुक्तांनी "मास्टर प्लॅन" तयार केला आहे. हया कामी भूमि संपादनासाठी जे ४० लाख रुपये लागणार आहेत, ते त्या खात्याला उपलब्ध करुन देण्याचा मी जरुर प्रयत्न करणार आहे. बजेटच्या हजार कोटींपैकी ४० लाख रुपये उपलब्ध करुन देणे, ही काही फार मोठी अडचणीची गोष्ट नाही. त्यामुळे रहदारी, गर्दी, अपघात कमी होतील. मुख्य रस्त्याला जोडणाऱ्या जोडरस्त्यांवर दूकानदारांचे पुनर्वसनही करता येईल."

"साईबाबा अशाप्रकारचे संत होते की, ज्यांनी राष्ट्रीय एकात्मतेची, सर्वधर्म

समभावाची, धर्मनिरपेक्षतेची शिकवण दिली, ज्याची देशाला आज खूप गरज आहे म्हणूनच सर्व धर्मांचे, सर्व जातीचे, सर्व भाषेचे लोक शिरडीला येत असतात. येथे येताना प्रत्येकाने पवित्र, धार्मिक, आध्यात्मिक भावनेने, भक्तिभावाने, अंतःकरणशुध्दीसाठी यायला हवे. केवळ भजने म्हटली, आरत्या गायल्या म्हणजे बाबांची भक्ती केली, असे व्हायला नको, बाबांची शिकवण प्रत्यक्ष आचरणात आणली पाहिजे.''

''तिरुपती येथे प्रत्येक राज्य सरकारने त्यांच्या राज्यांतून जाणाऱ्या लोकांची राहण्याची सोय व्हावी म्हणून निवासस्थाने बांधली आहेत. महाराष्ट्र शासनही महाराष्ट्रातून जाणाऱ्या जवळ जवळ २००० यात्रेकरुंची सोय व्हावी म्हणून तेथे निवासस्थान बांधणार आहे. शिरडीत संस्थाननेच मोठे निवासस्थान बांधायला घेतले आहे. त्यात दोन मोठे सभागृह बांधून ३५०० भाविकांची मोफत सोयही होणार आहे. संस्थानची ही कामगिरी अभिनंदनीयच म्हटली पाहिजे.''

''सरकारने पर्यटन विकासावर भर दिला असल्याने शिरडीत विमानतळ बांधण्याची आखणी केली आहे. प्रत्येक जिल्हयाच्या ठिकाणी हवाई धावपट्टी बांधण्याचे सरकारचे धोरण आहे. यामुळे उद्योजक ग्रामीण भागात जाऊ शकतील व त्यामुळे त्या भागात उद्योगधंदे निर्माण होतील, नोकऱ्या उपलब्ध होतील व पर्यायाने त्या भागाचा विकास होईल. हेच धोरण समोर ठेऊन शिरडीत विमानतळ बांधण्याची योजना आहे. जागेच्या खर्चासाठी संस्थानने व्याजाने पैसे दिले तर विभागीय आयुक्त लगेच कामाला सुरुवात करतील.''

''विना अनुदान तत्त्वावर वैद्यकीय महाविद्यालय सुरु करण्याचा संस्थानचा विचार आहे. वैद्यकीय महाविद्यालयासाठी साधारणपणे १५० खाटांचा निकष लावला जातो. आणि आता तर संस्थानच्या रूग्णालयात २०० खाटा होणारच आहेत. संस्थानने जर आमच्याकडे मागणी केल्यास अर्थमंत्री म्हणून मी ती मंजूर करायला तयार आहे.''

''संस्थानच्या अद्ययावत रुग्णालयामुळे भक्तांची, ग्रामस्थांची व आजूबाजूच्या ग्रामीण भागातील लोकांची सोय होणार आहे. यासाठी संस्थानला खरोखरीच धन्यवाद दिले पाहिजेत.''

भाषणाच्या अखेरीस मा. श्री. रामराव आदिक यांनी संस्थानने गेल्या सात महिन्यांत जसे प्रशंसनीय काम केले, तसेच पुढेही लोकांना सोयी उपलब्ध करुन देण्यासाठी लोकाभिमुख काम केले, तर सरकारकडून त्यांना आर्थिक सहयोग देण्यात येईल, असे आश्वासन दिले.

आरोग्य मंत्री मा. श्रीमती पुष्पाताई हिरे यांनी त्या १९५० पासून शिरडीत येत असल्याने ह्या कार्यक्रमात भाग घेताना त्यांना विशेष आनंद होत असल्याचे अध्यक्षीय भाषणात सांगितले.

वैद्यकीय महाविद्यालय सुरु करण्याला प्राधान्य द्यायचे सरकारचे धोरण असल्याचे सांगून मा. श्रीमती पुष्पाताई हिरे यांनी शासनाच्या निकषांमध्ये बसत असेल तर संस्थानला वैद्यकीय महाविद्यालय काढायला परवानगी देता येईल, असे आश्वासन दिले.

त्या पुढे म्हणाल्या की, ‘‘परमेश्वर तुमच्या-आमच्यात असल्याने आपण भाविकांशी विनम्रतेने वागले पाहिजे. चांगल्या मनाने येथे यायला पाहिजे व चांगल्या मनाने मंदिराचे पावित्र्य राखले पाहिजे.’’


संस्थानच्या अध्यक्षांना विनंती करताना त्या म्हणाल्या की, ‘‘ग्रामीण भागातील महिलांना स्वत:च्या पायावर उभे राहण्यासाठी संस्थानच्या वतीने लघु-उद्योग सुरु करण्यात यावेत. महिला एकदा कामाला लागल्या की जिद्दीने कामाला लागतात, मनापासून काम करतात. संधी मिळाली तर त्या निश्चितपणे प्रयत्न करतात, टंगळ मंगळ करीत नाहीत. जो शब्द देतात तो त्या अवश्य पाळतात.’’

संस्थानच्या अध्यक्षा महिला असल्याने त्या नक्कीच ह्या विनंतीचा विचार करतील, अशी आशाही त्यांनी यावेळी व्यक्त केली.

गोरगरीबांकरिता शिरडी परिसरात प्राथमिक शाळा सुरू करण्याची विनंतीही त्यांनी विश्वस्त मंडळाला केली.

मा. श्री. शंकरराव कोल्हे यांनी आपल्या भाषणात सूचना केल्या की, गरीब भाविकांसाठी ४-५ हजार लोकांची व्यवस्था होईल अशी विशाल धर्मशाळा संस्थानद्वारा बांधली जावी. मंदिराजवळ होणाऱ्या गर्दीची समस्या सोडविण्यासाठी जोडरस्ते बांधले जावेत. ‘‘साईभक्त निवासा’’जवळ शॉपिंग सेंटर बांधले जावे.

मा. श्री. ल. र. हातणकर यांनी आपल्या भाषणात बांधकामाविषयीची कामे लवकरच पूर्ण करुन देण्याचे आश्वासन दिले.



## ''शिरडीच्या सर्वांगीण विकासासाठी संस्थानच्या अनेकविध योजना''

- डॉ. लेखा पाठक,
अध्यक्षा, विश्वस्त मंडळ

परम पवित्र तीर्थक्षेत्रावर, बाबांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या शिरडीत संस्थानच्या अध्यक्षा डॉ. लेखा पाठक यांनी उपस्थित सर्वांचे हार्दिक स्वागत केले. स्वागतपर भाषणात त्या म्हणाल्या की, ''साईबाबा मनुष्यरूपात ईश्वराचा अवतार होते. त्यांच्या शिरडीतल्या अनोख्या, अद्‌वितीय मंदिराची ख्याती आज जगभर पसरली आहे. येथे जाती-भेदाचा, धर्म-भेदाचा, पंथ-भेदाचा लवलेशही नाही. बाबांच्या ''सबका मालिक एक हैं'' ह्या वचनाला अनुसरून सगळे कसे भाषावाद, प्रांतवाद, वर्गवारी सारे सारे काही विसरून एकत्र येतात, साईचरणी लीन होतात. हिंदू, मुस्लिम, शीख, ख्रिश्चन इत्यादि भिन्न भिन्न धर्म येथे बाबांच्या ''सब धर्म एक हैं''च्या उपदेशाप्रमाणे एकाच धर्मात विलीन होतात. महात्मा गांधी, पंडित जवाहरलाल नेहरूसारखे कित्येक महान नेते शिरडीला आले होते. त्यांनी आपल्या पुस्तकांतही याचा उल्लेख केलेला आहे. जाती-जातींतील मतभेद मिटवायचे असतील, तर प्रत्येक व्यक्तीने शिरडीला गेलेच पाहिजे, असेही त्यांनी म्हटले आहे. साईबाबांच्या मंदिराला केवळ महाराष्ट्रातच, देशातच नव्हे, तर विदेशांतही प्रसिद्धी मिळाली आहे. जवळ जवळ जगभर बाबांच्या मंदिरांची स्थापना झाली आहे, त्यांचे भक्तगणही सर्वदूर पसरलेले आहेत. यावरून असेच अनुमान निघेल की, ह्या विश्वात सर्व धर्मांत मान्यता पावलेली ''साईबाबा'' ही एकमेव देवता असेल.''


दर्शनार्थी साईभक्तांच्या निवासाच्या सोयीविषयी आस्थेने बोलताना अध्यक्षांनी माहिती दिली की, ''सात महिन्यांपूर्वीच नवनियुक्त विश्वस्त मंडळाची नेमणूक झाली असून नानाविध अडचणींना सामोरे जात मंडळाला आपले काम सुरू करावे लागले आहे. बाबांच्या दर्शनार्थी भक्तांची इच्छा असते की, शिरडीत त्यांची बाबांच्या जवळच निवासाची व्यवस्था व्हावी; परंतु शिरडीत येणाऱ्या बाबांच्या भक्तांची संख्या एवढी वाढली आहे की, इच्छा असूनही संस्थानला केवळ २५०० भक्तांच्या निवासाची सोय करणे शक्य होते. त्यामुळे कित्येक भक्तांना निराशा पत्करावी लागते. म्हणूनच मंडळाने भक्तांच्या निवासाच्या सोयीला फार मोठे महत्त्व दिले आणि ५०० खोल्या असलेली इमारत बांधण्याचे ठरविले. त्याच इमारतीचा भूमिपूजन समारंभ आज या ठिकाणी संपन्न होत आहे. ह्या खोल्यांमध्ये स्वतंत्र सुविधा उपलब्ध असतील. २४ तास थंड-गरम पाण्याची सोय असेल. आज ज्या खोल्या भक्तांना रहायला मिळतात,

त्या करिता फारच अल्प दर आकारला जातो, तर सभागृहात विनामूल्य व्यवस्था केली जाते. नियोजित ''साईबाबा भक्त निवासा''तही अगदी वाजवी दर आकारला जाईल व ३५०० भक्तांची विनामूल्य सोय होईल असे दोन भव्य-दिव्य सभागृहही यात बांधले जातील.''

भक्तांच्या आहारासंबंधी बोलताना अध्यक्षांनी सध्या उपलब्ध असलेल्या सोयींची व नजिकच्या काळात ह्या विषयीच्या संस्थान करणार असलेल्या अन्य भरीव सुविधांची माहिती करून दिली. त्या म्हणाल्या की, ''संस्थानच्या वतीने एक कॅन्टीन चालविण्यात येते. तेथे सकाळी साधारणत: १५०० ते २००० फूड-पॅकेटस्‌ची विक्री होते. संस्थानच्या प्रशस्त प्रसादालयात जवळ जवळ ४००० भक्त सकाळ-संध्याकाळ बाबांच्या प्रसादाचा लाभ घेतात. ताटामागे केवळ ३.५० रुपयात हवे तेवढे भोजन भक्तांना पुरविण्यात येते. यामध्ये अधिकाधिक सुधारणा व्हाव्यात व भक्तांना समाधानाने भोजनाचा आस्वाद घेता यावा, यासाठी नजिकच्या काळात अनेक योजना कार्यान्वित करण्यात येणार आहेत.''

संस्थानच्या ''साईनाथ'' रुग्णालयात तज्ज्ञ डॉक्टरांच्या नुकत्याच नियुक्त्या करण्यात आल्या. त्या संदर्भात अध्यक्षांनी सांगितले की, ''संस्थानच्या वतीने १०० खाटा असलेले ''साईनाथ'' रुग्णालय चालविण्यात येत असून केवळ तीनच डॉक्टर येथे काम करीत होते. प्रमुख वैद्यकीय अधिकाऱ्याचे पद तर गेल्या कित्येक दिवसांपासून रिकामे होते. संस्थानने हे पद भरण्याचा व रुग्णांना न्याय मिळावा यासाठी अन्य काही तज्ज्ञ डॉक्टरांच्या नियुक्त्या करण्याचा निर्णय घेतला. आणि त्यानुसार १२ विशेषज्ञांच्या नेमणुका करण्यात आल्या. त्याचप्रमाणे रक्तपेढी, सोनोग्राफी, पॅथॉलॉजी, आय.सी.सी.यू. आदींची व्यवस्थाही ह्या रुग्णालयात करण्यात येणार आहे, जेणेकरून भक्तांना, यात्रेकरूंना, पर्यटकांना, शिरडी ग्रामस्थांना व शिरडी परिसरातील अन्य ग्रामवासियांना कुठल्याही आजारावर येथे इलाज उपलब्ध होईल.''

संस्थानच्या उत्पन्नाविषयी बोलताना अध्यक्षांनी सांगितले की, ''संस्थानला देणग्यांतून मिळणाऱ्या उत्पन्नापैकी दोन तृतीयांश भाग कर्मचाऱ्यांच्या वेतनावर खर्च होतो. ज्या बँकांतील संस्थानच्या कायम ठेवींची मुदत संपली होती, तेथून त्या काढून अधिक व्याज देणाऱ्या बँकेत गुंतविण्याचे ठरले. त्याप्रमाणे सेंट्रल बँक ऑफ इंडियाने सर्वात अधिक, म्हणजे १३.०० टक्के व्याज देऊ केल्याने ''सर्टिफिकेट डिपॉझिट'' योजनेत दोन कोटी रुपये गुंतविण्यात आले आहेत. त्यामुळे संस्थानला सुमारे २६ लाख रुपयांचा अधिक फायदा होणार आहे.''



शिरडीतील पाण्याची समस्या सोडविण्यात मंडळाच्या प्रयत्नांना यश आल्याचे समाधान व्यक्त करताना अध्यक्षांनी सांगितले की, ''येथील पाण्याचे क्लोरिनिकरण केले जाते. दर तीन दिवसांनी ते तपासले जाते. केंद्र सरकारची एक योजनाही येथे पाणी उपलब्ध करून देण्यासाठी कार्यान्वित आहे. बरेचसे काम झाले आहे. उरलेले काम तत्परतेने पार पाडण्यासाठी सुयोगाने आज येथे नामदार उपस्थित आहेत, त्यांनी या कामी लक्ष घालावे, अशी त्यांना मी विनंती करते.''

आरोग्याविषयी बोलताना अध्यक्षा म्हणाल्या की, ''येथील गटारे उघडी असल्याने दुर्गंधीचा फैलाव होतो व आरोग्यास धोका पोहचतो. ही गटारे बंद करायचा संस्थानचा विचार आहे. नगरपालिकेने भुयारी गटारांची योजना आखली आहे; परंतु त्यांच्याकडे पुरेसा पैसा नाही. नगरपालिका, संस्थान व हॉटेलवाले यांनी जर संयुक्तपणे यासाठी पैसा उभा केला, तर नगरपालिकेची ही सुरेख योजना अंमलात येऊ शकेल.''

अध्यक्षांनी मंडळाची शिरडीत वैद्यकीय व तांत्रिक महाविद्यालय सुरू करण्याची योजना असल्याचे सांगून उपस्थित मंत्रीमहोदयांना त्यांनी ह्या योजनेला संमती दयावी व ही योजना कार्यान्वित करण्यासाठी राज्य सरकारने ''स्टेट फार्मिंग'' मधील २०० एकर जागा संस्थानला विनामूल्य दयावी, अशी विनंती केली.

मंदिराच्या सुशोभिकरणाची माहिती देताना अध्यक्षांनी सांगितले की, ''शांत वातावरणात राहिल्याचं तृप्त समाधान मिळावं म्हणून मंदिराच्या जवळच बागेची निर्मिती करण्यात येईल व नजिकच ध्यानधारणेसाठी सभागृह बांधण्यात येईल.''

स्वागतपर भाषणाचा समारोप करताना अध्यक्षांनी काही योजनांचे काम सुरू झाले असून उर्वरित योजना नजिकच्याच काळात कार्यान्वित होतील व अल्पावधीतच आपल्याला त्या प्रत्यक्षात साकारलेल्या दिसतील, असा आशावाद व्यक्त केला.

समारंभाला उपस्थित असलेली पाहुणे मंडळी साईबाबांच्या शिरडीशी संबंधित असल्याचा अध्यक्षांनी आपल्या भाषणात आवर्जून उल्लेख केला.

संस्थानच्या बांधकाम उपसमितीचे उपाध्यक्ष श्री. मोतीराम पवार यांनी आभार मानले. ह्या समारंभाला सौ. सिंधु कोल्हे, प्रवरा सहकारी साखर कारखाना लि., प्रवरानगरचे चेअरमन डॉ. राधाकृष्ण विखे पाटील, कोपरगांव सहकारी साखर कारखाना लि., कोळपेवाडी चे चेअरमन श्री. शंकररावजी काळे, संस्थानचे विश्वस्त सर्वश्री हेमराज शहा, मनोहर गोगटे, पृथ्वीराज रा.आदिक, शिवराम शिंदे, राजीव प्र. कुळकर्णी, एकनाथ गोंदकर, प्रभाकर तु. बोरावके, भीमाशंकर खांबेकर, बाबुराव नरोडे (पाटील), प्रभाकर बी. बोरावके, उत्तमराव शेळके, सोपान धोरडे, कारभारी देवकर, प्रशांत व्यं.

अण्णासाहेब म्हस्के, गोपिनाथ ब. कोते (पाटील), श्रीपतराव जाधव, मोहन जयकर आदी मान्यवर उपस्थित होते. मा. श्री. कोल्हे यांच्या हस्ते इंग्रजी माध्यमाच्या शाळेचे उद्‌घाटनही यावेळी करण्यात आले.



डी येथील संस्थानच्या नवीन इंग्रजी माध्यमाच्या शाळेच्या उद्‌घाटनप्रसंगी डावीकडून - डॉ. लेखा पाठक, श्री. कोल्हे, श्रीमती पुष्पाताई हिरे, श्री. आदिक

संसारामध्ये राहून जो साधना करू शकतो तो खरा वीर साधक. वीर पुरुष ज्याप्रमाणे डोक्यावर जड ओझे असताना सुद्धा वाटेल त्या दिशेला मान वळवून पाहू शकतो, त्याचप्रमाणे वीर साधकही संसाराचा भार शिरावर घेवून सुद्धा ईश्वराकडे लक्ष ठेवू शकतो.

- श्रीरामकृष्ण-वाक्सुधा



### श्री साई दर्शनार्थी व ग्रामस्थांकरिता

# श्री साईमंदिर परिसराचा अल्पावधीतच सर्वांगीण विकास

## विद्यमान विश्वस्त मंडळाच्या उल्लेखनीय योजनांची काही ठळक वैशिष्ट्ये

* निवासाची सोय
* सहज-सुलभ दर्शन
* नवीन इंग्रजी शाळा
* ध्यानधारणेसाठी सभागृह
* मंदिराचे सुशोभिकरण
* अद्ययावत व परिपूर्ण रुग्णालय
* पुरेसं व शुद्ध पाणी
* २४ तास खुले उपहारगृह
* आरोग्यविषयक दक्षता
* वहातुक सवलतींमध्ये लक्षणीय सुधारणा

* मोठ्या आकारात, आकर्षक स्वरुपात व नियमित वेळेत ''श्री साईलीला''चे प्रकाशन

सध्याच्या माणसाला माणूस दूरावत असलेल्या ह्या वर्तमान स्थितीत श्री साईबाबांच्या सर्वधर्मसमभावाच्या शिकवणुकीची प्रकर्षाने आठवण येते. बाबांनी त्यांच्या मानवदेहरुपात अनेक भक्तांना त्यांच्या दैवतांच्या रुपात दर्शन देऊन ''सबका मालिक एक'' असून केवळ त्याच्या विविध रुपांची आपण वेगवेगळ्या पद्धतीने पूजा करतो, हे दाखवून दिले. बाबांनी हा अमूल्य, महान संदेश ज्या शिरडीतून दिला, ती शिरडी आज ''राष्ट्रीय एकात्मतेचं'' प्रतिक म्हणून ओळखली जात आहे. बाबांनी म्हटलेच होते की, शिरडीला लोकांची मुंग्यांसारखी रीघ लागेल. देशाच्या कानाकोपऱ्यातूनच नव्हे, तर परदेशांतूनही अनेक जाती-धर्मांतील, भिन्न भिन्न थरांतील भाविक लाखोंच्या संख्येने शिरडीत येत आहेत. दिवसेंदिवस शिरडीला येणाऱ्या यात्रेकरुंची संख्या वाढतच आहे. त्यामुळे भक्तांसाठी येथे उपलब्ध असलेल्या सोयी-सवलती अपुऱ्या पडत आहेत. आणि म्हणूनच डॉ. लेखा पाठक यांच्या नेतृत्वाखालील विद्यमान विश्वस्त मंडळाने श्री साईबाबा मंदिर परिसराचा विकास करण्याचा निर्णय घेतला आहे, बहुउद्देशीय योजना आखल्या आहेत, काही योजनांचं कामही सत्वर सुरु झालं आहे. त्यापैकी काही प्रमुख, ठळक योजनांचं संक्षिप्त विवरण आम्ही आमच्या ''श्री साईलीला'' वाचकांसाठी पुढे देत आहोत.

श्री साईबाबा शिरडीत मानवीरुपात असताना उत्सवाच्यावेळी सुरुवातीला ५०००-७००० भक्त शिरडीला येत असत; काही वेळा तर ही संख्या ७५,००० पर्यंतही जात असे. त्या सुमाराला साईभक्त श्री. हरी विनायक साठे यांनी नीम वृक्षाच्या नजिक एक वाडा बांधला, जो पुढे "साठे वाडा" म्हणून ओळखला जाऊ लागला. बाहेरुन येणाऱ्या यात्रेकरुंची येथे निवासाची व्यवस्था केली जात असे. त्यानंतर साईभक्त नानासाहेब चांदोरकरांना बाबांची कृपा झाल्याने त्यांनी शिरडीत होणारी भक्तांची गर्दी लक्षात घेऊन एक वाडा बांधण्याची योजना आखली. त्या भवनाचा शिलान्यास समारंभ १-१२-१९१० रोजी संपन्न झाला व ई.स. १९११ ला रामनवमीच्या दिवशी "दीक्षित वाड्या"चे यथाविधि उद्घाटन झाले. त्यानंतर नागपूरचे श्रीमंत बूटी यांनी एक वाडा बांधला, जो आज "समाधी मंदिर" म्हणून परिचित झाला आहे. अशाप्रकारे भक्तांची अलोट गर्दी व त्या करिता उपलब्ध व्यवस्था, यांत कुठेतरी समतोल साधण्याचा वेळोवेळी प्रयत्न केला गेला. परंतु बाबांची ख्याती विश्वविख्यात झाल्याने प्रशांत सागरासारखा भक्तांचा प्रवाह सतत शिरडीला वाहत आहे; त्यामुळे असलेल्या सुविधा अपुऱ्या पडत आहेत. प्रकर्षाने जाणवणारी उणीव म्हणजे येथे येणाऱ्या भक्तांच्या निवासाची सोय.

सध्या श्री साईबाबांच्या दर्शनाला येणाऱ्या भक्तांची संख्या दिवसाला प्रतिदिन सरासरी ९ ते १० हजार आहे. गुरुवारी, शनिवारी व रविवारी ही संख्या १५ ते २० हजार किंवा त्याहीपेक्षा अधिक होते. विजयादशमी, रामनवमी व गुरुपौर्णिमा ह्या विशेष उत्सवांच्यावेळी तर भक्तांची उपस्थिती एक लक्षावर जाते. संस्थान सध्या दोन ते अडीच हजार भक्तांची निवासाची सोय उपलब्ध करून देऊ शकते. भक्तांची एकच गर्दी व निवासाची अपुरी सुविधा या तफावतीमुळे कित्येक भक्तांना त्रास सहन करावा लागतो. ही विशेष जाणवणारी निवासाची बाब लक्षात घेऊन विश्वस्त मंडळाने भक्तांना निवासाची सोय उपलब्ध करुन देण्याला अधिक प्राधान्य दिले आहे. त्याला अनुसरून विश्वस्त मंडळाने "साईबाबा भक्त निवास" ही निवासी इमारत बांधण्याचा निर्णय घेतला. ह्या नियोजित निवासी इमारतीचा भूमिपूजन समारंभ दिनांक ४ मे १९९० रोजी संपन्न झाला. ही नियोजित निवासी इमारत एका वर्षात बांधून तयार होणार आहे. स्वतंत्र सोयी उपलब्ध असतील अशा ह्या निवासी इमारतीत साडेतीन हजार भक्तांची सोय होईल असे दोन प्रशस्त सार्वजनिक सभागृहही असतील. याशिवाय नजिकच्या काही दिवसांतच ८० खोल्यांची "प्रसादालय" ही नवीन इमारत बांधून पूर्ण होत असून भक्तांना ती निवासाकरिता लवकरच उपलब्ध होईल.

बाबांनी अन्नदानाला फार मोठं महत्व दिलं होतं. बाबांची "हुंडी" तर बहुतेक

सर्व भक्तांना ज्ञात आहेच. त्याला अनुसरून संस्थानने "प्रसादालय" सुरु केले. भक्तांच्या दुपारच्या व रात्रीच्या भोजनाची व्यवस्था ह्या प्रसादालयात केली जाते. सरासरी ८ ते १० हजार भक्त ह्या प्रशस्त "प्रसादालया"त बाबांच्या प्रसादाचा अगदी अल्प दरात भरपेट लाभ घेत असतात. संस्थानच्यावतीने ५०० गोरगरीबांना मोफत भोजन दिले जाते. संस्थानचे एक उपहारगृह असून २४ तास ते कार्यरत असते. त्या ठिकाणी चहा/कॉफी/अल्पोपहार मिळण्याची व्यवस्था केलेली आहे.. त्याचप्रमाणे सकाळच्यावेळी सुमारे १५०० ते २००० भक्तांकरिता येथे अगदी अल्प दरातील पुरी-भाजी व शिरा असलेली फूड-पॅकेटस् उपलब्ध असतात.

बाबांनी त्यांच्या देहावतारात तन्मयतेने, आत्मीयतेने अनेक रुग्णांची सेवा केली, कित्येकांचे दीर्घकालीन आजार बरे केले, बरे न होतील असे कैक विकारही दूर केले. बाबांच्या ह्या कार्याचा आदर्श समोर ठेऊन संस्थानच्यावतीने "साईनाथ" रुग्णालयाची स्थापना झाली. ह्या रुग्णालयात १०० खाटा आहेत. कामाचा व्याप अधिक वाढल्याने ह्या रुग्णालयाच्या संबंधात विश्वस्त मंडळाने काही महत्वपूर्ण निर्णय घेतले आहेत. डॉक्टरांच्या अपुऱ्या संख्येमुळे प्रत्येक रुग्णाला माणुसकीच्या दृष्टिकोणातून न्याय देणे केवळ अशक्य होते; म्हणून काही विशेषज्ञांची ह्या रुग्णालयात नियुक्ती करण्यात आली आहे. रुग्णांना योग्य व परिपूर्ण वैद्यकीय सेवा उपलब्ध व्हावी म्हणून रुग्णालयाचे विस्तारीकरण करण्यात येणार असून त्यात १०० अधिक खाटा सामाविष्ट करण्यात येतील. त्याचप्रमाणे येत्या काही दिवसांतच रक्तपेढी, सोनोग्राफी, आय.सी.सी.यू., अद्ययावत रेडिओलॉजी व पॅथॉलॉजीची व्यवस्था करण्याची योजना विश्वस्त मंडळाच्या विचाराधीन आहे. त्यामुळे गंभीर आजारात रुग्णाला जे मुंबईला किंवा नागपूरला जावे लागते, ते यापुढे नक्कीच थांबेल.

विश्वस्त मंडळ एक आय.टी.आय. इन्स्टिटच्यूट चालवित असून ह्या शैक्षणिक संस्थेत इलेक्ट्रिकल ट्रॅक्टर मेकॅनिक आणि मोटर मेकॅनिक डिप्लोमा कोर्सेस शिकवले जातात. मंडळाच्यावतीने होतकरु व हुशार विद्यार्थ्यांना शिष्यवृत्त्या व गरीब रुग्णांना वैद्यकीय मदत दिली जाते.

निरनिराळ्या भागांतून येणाऱ्या भक्तांसाठी सुशोभित मंदिर, रांगेत प्रतिक्षा न करता सहजसाध्य दर्शन, मनःशांती व ध्यानधारणेसाठी जागा, धार्मिक समारंभांचे आयोजन, पाकिटमारीला व भिकाऱ्यांना प्रतिबंध इत्यादी कार्यान्वित करायच्या योजना मंडळाच्या विचाराधीन आहेत, ज्यामुळे हे मंदिर जगभर एक आदर्श देवस्थान म्हणून मान्यता पावेल.

अभिषेक हा एक पूजेचा लोकप्रिय प्रकार आहे. पूर्वी अभिषेकांची संख्या जास्त होती. या पूर्वीच्या विश्वस्त मंडळाने ती ३०० पर्यंत आणली. अभिषेकांमुळे मंदिरातील बरीचशी जागा अभिषेक करणाऱ्यांकडून व्यापली जाते व दर्शनार्थींची मात्र त्यामुळे गैरसोय होते. अभिषेक बंद केल्याने बाबांचे दर्शन आता रांगेत तिष्ठत न राहता सहज, सुलभ झाले आहे. परंतु समाजातील विविध थरांतून लांबून येणाऱ्या भक्तांच्या भावना ह्या अभिषेकात गुंतलेल्या आहेत. म्हणूनच विश्वस्त मंडळाने अभिषेक सुरु करण्याचा निर्णय घेतला आहे. मंदिराच्या सुशोभिकरणाबरोबरच अभिषेकाची ही पद्धत पुन्हा सुरु केली जाणार आहे. अशाप्रकारे सुलभरीत्या करता येईल अशा अभिषेक पद्धतीत जवळ जवळ ५०० भक्तांना अभिषेक करता येईल. लाखो साईभक्तांना समाधीवर उभे राहिलेले किंवा बसलेले वा बाबांच्या मूर्तीला स्पर्श केलेले आवडत नाही. विशेषज्ञांनी दिलेल्या सल्ल्यानुसार समाधीवर चढणे योग्य नसून साईबाबांचे पावित्र्य त्यामुळे भंग पावण्याची शक्यता आहे. देशातील अनेक मोठ्या मंदिरांमध्ये दारावरुनच दर्शन घेतले जाते, कुणालाही आत प्रवेश दिला जात नाही. म्हणूनच विश्वस्त मंडळ समाधीवर चढण्याच्या व मूर्तीला स्पर्श करण्याच्या विरुद्ध आहे. अशाप्रकारच्या भक्तीला बाबा काही विशेष आशीर्वाद देत नाहीत. बाबांबद्दलच्या सद्भावना, त्यांचे पावित्र्य राखण्यासाठी आपल्यापैकी कुणीच समाधीवर चढणे योग्य नाही, असे विश्वस्त मंडळाचे मत आहे. ह्या योजनेचे अनेकांनी पत्रे पाठवून स्वागत केले आहे.

पाण्याची समस्या आता जवळ जवळ संपुष्टात आली आहे. धरण, कालवा आदींच्या कामाच्या गतीने वेग घेतलेला असून ती कामे वर्षभरातच पूर्ण होऊन स्वच्छ पाणी उपलब्ध होईल. केंद्र सरकारची १ कोटीची योजना असून तीवर आतापर्यंत ११ लाख रुपये खर्च झाले आहेत. सध्या पुरेसे पाणी उपलब्ध असले, तरी शुद्धतेचा अभाव आहे. त्यासाठी प्रत्येक तीन दिवसांनंतर पाण्याचे क्लोरिनिकरण करण्यात येते. तसेच तपासणीसाठीही ते पाठविले जाते. किमान गेल्या सहा महिन्यांत तरी सर्व भक्तांना पाणी मिळालेले आहे. वर्तमान विश्वस्त मंडळाने पाण्याची ही फार मोठी समस्या अल्पावधीत सोडविण्यात यश मिळविले असून २४ तास पाणी उपलब्ध करुन दिले आहे.

संस्थानचे सफाई कामगार केवळ मंदिराचीच नव्हे, तर मंदिरानजिकच्या परिसराचीही स्वच्छता राखतात. उघडी असलेली गटारे प्रदूषण टाळण्याकरिता लवकरच बंद करण्यात येणार आहेत. नगरपालिका व शासनकर्त्यांनी मदतकार्याचा हात पुढे केल्याने त्यांच्या सहकार्याने शिरडी स्वच्छ व हरित करण्याचे विश्वस्त मंडळाने ठरविले आहे.

शिरडीत जुगार, मद्य आदींचा फैलाव झाला असल्याच्या तक्रारी आहेत. ह्या गैरकृत्यांविरुद्ध कारवाई करणे संस्थानच्या अखत्यारीतील बाब नसली, तरी त्याविरुद्ध कडक कारवाई व्हावी म्हणून संस्थान सरकारशी संपर्क ठेवून आहे.

त्याचप्रमाणे मंदिरानजिक ध्यानधारणा सभागृह बांधणे, अन्नपदार्थ, पाणी आदी आरोग्यविषयक बाबींमध्ये अधिकाधिक सुधारणा करणे, योग्य व चांगल्या गुंतवणूक योजनांद्वारे संस्थानच्या उत्पन्नात अधिकाधिक भर घालणे, शिरडीत नव्या इंग्रजी शाळेची सुरुवात करणे, "श्री साईलीला" मासिक मोठ्या आकारात, आकर्षक स्वरूपात परिपूर्ण करणे, एस्.टी. आदी वहातुक सवलतींमध्ये सुधारणा आणणे, भक्तांकरिता खोल्या आरक्षित करण्याची सोय उपलब्ध करणे, विमानतळ, नवीन सुसंघटीत संस्थान कामकाजविषयक कार्यालय, विना अनुदान वैद्यकीय व इंजीनियरिंग महाविद्यालय सुरु करणे इत्यादी अनेक योजना नजिकच्या काळात कार्यान्वित होणार आहेत.

विश्वस्त मंडळाच्या अध्यक्षा डॉ. लेखा पाठक ह्या विख्यात हृदयरोगतज्ञ असल्या व स्वत:च्या कामात अत्यंत व्यग्र असल्या, तरी बाबांची मनोभावे सेवा करणाऱ्या त्या निस्सीम भक्त असल्याने जास्तीत जास्त वेळ त्या संस्थानच्या कामाकरिता देत आहेत; आखलेले योजनाबद्ध कार्यक्रम कार्यान्वित व्हावेत, परिपूर्ण व्हावेत म्हणून जातीने लक्ष घालीत आहेत; अविश्रांत परिश्रम घेत आहेत; वारंवार शिरडीला येऊन प्रत्येक विभागात जाऊन कामाची प्रत्यक्ष पाहणी करीत आहेत. देवस्थानांचा अभ्यास व्हावा म्हणून त्यांनी तिरुपती, वैष्णवदेवी आदी अनेक तीर्थस्थानांना भेटी दिल्या आहेत. १९७३ पासून बाबांच्या दर्शनाकरिता त्या शिरडीला येत असल्याने शिरडीत कोणत्या गोष्टींची आवश्यकता आहे, ह्या निरीक्षणाचा अनुभवही त्यांच्या गाठीशी आहे. ह्या त्यांच्या सततच्या प्रयत्नशीलतेचा, कुशाग्र बुद्धिमत्तेचा व एकाग्रतेचा संस्थानला नक्कीच लाभ होईल व विश्वस्त मंडळातील त्यांच्या सहकाऱ्यांकडून त्यांना मिळत असलेल्या सक्रिय सहकार्यामुळे श्री साईबाबांची शिरडी एक आदर्श देवस्थान म्हणून लवकरच विश्वमान्य होईल, हे अगदी निश्चित.

# श्री गुरुपौर्णिमा उत्सव-सन-१९९०
# अखंड पारायण पद्धत

श्री गुरुपौर्णिमा उत्सवात श्री साईसत्‌चरिताचे पारायण दिनांक ६-७-१९९० रोजी सकाळी साडेसहा वाजता द्वारकामाईत सुरु होईल व दिनांक ७-७-१९९० ला सकाळी सहा वाजता त्याची सांगता होईल.

उत्सवाच्या पारायणात अध्याय वाचनासाठी भाग घेऊ इच्छिणाऱ्या भक्तांची गैरसोय टाळण्याच्या दृष्टीने खालीलप्रमाणे व्यवस्था केलेली आहे. पारायण हे ठराविक मुदतीत पूर्ण करावयाचे असल्याने श्री साईसत्‌चरित पोथी योग्य गतीने वाचू शकणाऱ्या भक्तांनीच कृपया ह्या पारायणात भाग घ्यावा.

पारायणात भाग घेऊ इच्छिणाऱ्या साईभक्तांनी आदल्या दिवशी, म्हणजे गुरुवार, दिनांक ५-७-१९९० रोजी दुपारी तीन ते सायंकाळी साडेसहा पावेतो मंदिर विभागाकडे आपले नाव नोंदवावे. नोंदणी केलेल्या साईभक्तांची त्याच दिवशी साडेसात ते साडेआठ दरम्यान ४८ चिठ्ठ्या काढून पारायणासाठी निवड करण्यात येईल व त्यांची यादी ताबडतोब जाहीर होईल. निकालाच्या वेळी नाव निघालेल्या भक्तांनी त्वरित टोकन घेऊन जावे.

ज्या क्रमाने चिठ्ठ्या निघतील त्याप्रमाणे साईभक्तांना पारायणात भाग घेता येईल. भक्त त्यांच्या क्रमाच्या वेळी हजर न राहिल्यास त्याचे नाव यादीतून कमी करून संस्थान सेवकामार्फत त्या अध्यायाचे पारायण होईल.

— वेळापत्रक —

| | |
|---|---|
| १. नोंदणी | गुरुवार, दिनांक ५-७-१९९० रोजी दुपारी ३-०० ते ६-३० पर्यंत |
| २. निकाल | रात्रौ ७-३० ते ८-३० पर्यंत |
| ३. बोर्डावर यादी जाहीर | रात्रौ १०-०० वाजता |

**कार्यकारी अधिकारी,**
श्री साईबाबा संस्थान, शिरडी



# साईभक्तांचे अनुभव

श्री साईबाबांचे लीला चरित्र अपार आहे. त्याची गोडी केवळ अवीट नसून पुन्हा पुन्हा चाखावयास मिळावी असे प्रत्येकास वाटते. बाबांना समाधि घेऊन आता जवळ जवळ ७२ वर्षे होत आली आहेत. आपल्या हयातीत व समाधीनंतर त्यांनी असंख्य भक्तांना आपल्या कृपेची प्रचीति दिली. हेमाडपंतांनी साई-सत्‌चरितात त्यांतील अनेक प्रसंग वठविले आहेत. दक्षिणेकडे बाबांचे एक महान भक्त कै. बी. व्ही. नरसिंहस्वामी महाराज होऊन गेले. त्यांनी स्वतः बाबांच्या अनुगृहीत अनेक भक्तांची त्यांना समक्ष भेटून बाबांच्या अद्‌भुत अनुभवांची माहिती घेतली व ती "श्री साईबाबांच्या भक्तांचे अनुभव" या नावाने पुस्तकरूपाने प्रसिद्ध केली. १९४३ साली इंग्रजीत प्रसिद्ध झालेल्या या पुस्तकाचा परिचय अनुवादरूपाने आमच्या मराठी वाचकांना करून देण्याचे आम्ही ठरविले आहे. श्री. शशिकुमार बाबूराव पटवर्धन (एम.ए.) यांनी अतिशय मेहनत घेऊन हा अनुवाद आपल्या खास शैलीत लिहिलेला आहे. या अंकापासून आम्ही हे अनुभव क्रमशः सादर करीत आहोत.

**कार्यकारी संपादक**

मूळ लेखक- कै. श्री. बी. व्ही. नरसिंहस्वामी, मद्रास
मराठी अनुवाद- श्री. श. बा. पटवर्धन, मुंबई

## "न्या. मेघश्याम भगवंत रेगे, इंदूर"

(दिनांक ११ जून १९३६)

श्री साईबाबा हे सृष्टीचे उत्पत्ती-स्थिति-लयकर्ता आहेत अशी माझी धारणा आहे. त्यांच्या महासमाधीपूर्वी व तदनंतरही माझी तीच धारणा कायम आहे. ते गेले नसून या घटकेलासुद्धा आहेत. माझ्या दृष्टीने त्यांना स्थलकालादि मर्यादा नव्हत्या. देहधारी असताना त्यांच्या पंचमहाभौतिक देहाच्या मर्यादा कधी कधी मला जाणवत होत्या. तरी त्यांचे अनंतत्त्व मला नेहमी प्रतीत होत असे. जड व चैतन्य यांची संपूर्ण एकरूपता अशी त्यांची प्रतिमा माझ्या समोर आहे. देहविसर्जनानंतर त्यांचे अनंतत्व रूप साईबाबा या नावाने उरले आहे.

तत्त्वज्ञान व तदंगभूत घटपटादि मीमांसा यात माझे चित्त कधीच रमले नाही.

बांची भाषा बरेच वेळा गूढ व दृष्टांतरूपी गोष्टींनी भरलेली असे. त्याचा निरनिराळ्या लोकाकडून निरनिराळा अर्थ लावला जात असे. एकदा ते याच पद्धतीने माझ्याशी बोलले व त्यांनी मला काही समजले का असे विचारले. तेव्हा बरीच भक्तमंडळी उपस्थित होती. मला काहीच समजले नाही असे मी उत्तर दिले. भक्तमंडळी निघून गेल्यावर मी त्यांना म्हणालो की त्यांच्या गूढ बोलण्याचा अर्थ मला उमगत नाही. तो उमगावा असे त्यांना वाटत असेल तर त्यांनी सरळ व सोप्या भाषेत मला सांगावे. त्यानंतर ते नेहमी माझ्याशी सरळ व सोप्या भाषेतच बोलले. मी साईबाबांच्याकडे प्रथम कसा आलो आणि आल्यानंतर माझे संपूर्ण जीवन त्यांनी कसे व्यापले याची थोडी पूर्वपीठिका देतो.

आमची कुलदेवता दुर्गा गोव्याची शांतादुर्गा आहे. ती रुद्रस्वरूपी नसून सौम्यस्वरूपी आहे. मला तिने नेहमी सुखात ठेवावे या हेतूने मी तिची नित्य पूजाअर्चा करून प्रार्थना करीत असे. आठव्या वर्षी मौजीबंधन झाल्यावर मला गायत्री व संध्येची दीक्षा मिळाली. अशा रीतीने मी दुर्गेकडून विष्णुनारायणाच्या उपासनेकडे वळलो. बालध्रुवाच्या कठोर तपश्चर्येवर प्रसन्न होऊन विष्णुभगवान प्रगट झाले आहेत असे एक चित्र आहे. त्या चित्राबद्दल मला अतीव आकर्षण वाटू लागले. मी जेव्हा त्या चित्रातील भगवंताच्या मूर्तीवर चित्त एकाग्र करण्याचा प्रयत्न करीत असे तेव्हा त्यातील बालध्रुवाच्या प्रतिमेमुळे माझे चित्त विचलीत होत असे. म्हणून त्या चित्रातील ध्रुवाची प्रतिमा कापून मी वेगळी काढली आणि तीवरून केवळ भगवंताचे ध्यान करू लागलो.

बालवयापासून मी आसने व प्राणायाम करीत असे. म्हणून पद्मासन किंवा सिद्धासनामध्ये मी १/२ तास सहज बसून कोणत्याही प्रतिमेवर पंधरा मिनिटे चित्त स्थिर करू शकत असे. कोणत्याही गुरुच्या मार्गदर्शनाशिवाय मी हे करीत असे. प्राणायामातही माझी थोडी प्रगती झाली होती. येणेप्रमाणे भगवंताच्या ध्यानाची माझी एकाग्रता खूपच वाढली होती. माझ्या वयाच्या एकविसाव्या वर्षापर्यंत ही साधना चालू होती. अशा वेळेस एके दिवशी अर्धवट निद्रावस्थेत मला खालील दृश्ये दिसली.

अंथरुणावर झोपलो असताना काहीतरी फरक जाणवू लागला. माझा देह अंथरुणावर असून मी त्या देहापासून विभक्त झालो आहे असे मी पाहिले. माझ्या समोरच भगवान नारायणाची आकृती उभी राहिली. हे दृश्य संपल्यावर सुमारे एक तासाने दुसरा अनुभव मिळाला. पहिल्याप्रमाणेच मी देहापासून विभक्त झालो असून माझ्यासमोर विष्णुभगवान उभे आहेत. त्यांच्या शेजारी दुसरी एक व्यक्ती आहे. त्या व्यक्तीकडे बोट दाखवून भगवान म्हणाले, "हे शिरडीचे साईबाबा आहेत. यांनाच तू शरण जा."

यानंतर थोड्या वेळाने पुन्हा एक दृश्य दिसले ते असे–

मी देहापासून अलग होऊन हवेत तरंगत जात असून एका खेड्यात आलो. समोर भेटलेल्या व्यक्तीला त्या खेड्याचे नाव विचारले. ''शिर्डी'' हे नाव ऐकल्यावर मी विचारले, ''येथे साईबाबा नावाचे कोणी आहेत का?'' यावर ''हो आहेत'', असे म्हणून त्याने मला मार्गदर्शन (द्वारकामाईपर्यंत) केल्यावर तेथे मला साईबाबा दिसले. ते पाय पुढे करून बसले होते. मी आदराने त्यांच्या चरणावर मस्तक ठेविले. ते लगेच उठले व म्हणाले, ''तू माझे दर्शन घेतोस? मी तुझ्या ऋणात आहे. म्हणून मीच तुझे दर्शन घेतले पाहिजे.'' असे म्हणून त्यांनी माझ्या पायावर मस्तक ठेविले. मग मी तेथून निघालो.

वरील तिन्ही दृश्यांचा माझ्यावर बराच परिणाम झाला. यापूर्वी मी साईबाबांचा दगडावर बसलेला फोटो पाहिला होता. पण तेव्हा बाबांच्याबद्दल मला इतर काहीच माहिती नव्हती. बाबा बरेच वेळा दोन्ही पाय लांब करून बसत असत हे सुद्धा मला माहीत नव्हते.

या घटनेनंतर काही दिवसांनी मला झालेल्या या दृष्टांतांची प्रचिती पाहण्यासाठी शिरडीस जाऊन बाबांचे दर्शन घ्यावे या उद्देशाने मी निघालो. शिरडीस पोहोचल्यावर दर्शनासाठी मशिदीत गेलो. तेथे बाबांजवळ बरीच भक्त मंडळी होती. मी जाऊन त्यांच्या चरणावर मस्तक ठेवले. ते म्हणाले, ''काय? सामान्य माणसाची पूजा करतोस?'' मी लगेच मागे सरून काही अंतरावर बसलो. बाबांनी दिलेला टोला मला फार लागला. माणसाची पूजा करू नये अशा तऱ्हेच्या बालिश कल्पना मनात बाळगून मी दर्शनाला गेलो होतो. त्या कल्पनेलाच तो टोला मिळाला असे मला वाटले. दृष्टांतात दाखविल्याप्रमाणे भक्ताचा गुरुदेवाने स्वीकार केला नाही याचा तीव्र खेद होऊन तशाच खिन्न स्थितीत मी बराच वेळ तेथे बसून राहिलो. तोपर्यंत दुपार झाली. बाबा एकटेच बसले होते. तेव्हा अशी प्रथा होती की दुपारच्या वेळेस बाबांच्या एकांताचा भंग कोणी करू नये. केल्यास बाबांची कठोर शिक्षा भोगावी लागेल. पण ज्या मनस्थितीत मी होतो त्यात मला भीति अजिबात वाटली नाही. ज्या आशेने मी शिरडीस गेलो होतो तिचा चक्काचूर झाला असताना मी कुठल्याही शिक्षेला का भ्यावे? फारतर बाबा मला मारतील! त्यांना मला काय शिक्षा करायची असेल ती करू देत. निर्धाराने मी पुढे पुढे सरकू लागलो. हे पहाताच बाबांनी हळूच त्यांच्या जवळ येण्याबद्दल खूण केली. यामुळे मनाला धीर वाटून मी जवळ जाऊन त्यांच्या चरणावर मस्तक ठेवले. लगेच त्यांनी मला दृढालिंगन देऊन जवळ बसावयास सांगितले. म्हणाले, ''तू माझे लेकरू आहेस. परके लोक जवळ असले म्हणजे आपल्या लेकराला जरा